# फिनोलेक्स अकॅडमी ऑफ मॅनेजमेंट अॅन्ड टेक्नॉलॉजी रत्नागिरी.
## नोटीस

FAMT/ADMN/512/2022
15/12/2022

## डॉ. पंजाबरात देशमुख वसतीगृह निर्वाह भत्ता योजना
## शैक्षणिक वर्ष 2022-23 मधील प्रवेशीत विद्यार्थी.

इंजिनीअरींग (UG) व एमसीए (PG) चे शैक्षणिक वर्ष 2022-23 मधील प्रवेशीत (रेग्युलर व प्रोव्हीजनल) विद्यार्थ्यांसाठी सूचना.

- सदर योजना महाराष्ट्र राज्यातील खुल्या प्रवर्गातील तसेच जे कॅटेगरीतील (OBC,SBC,VJNTDT,SC,ST) विद्यार्थी आहेत परंतू त्यांचा प्रवेश कॅटेगरी फॉर अॅडमिशन ओपन असा केंद्रीभूत प्रवेश प्रक्रीये मधून प्रवेश घेतला आहे अशांसाठी आहे. Domicile Certificate (महाराष्ट्र राज्याचे अधिवास प्रमाणपत्र) असणे आवश्यक.
- महाराष्ट्र राज्याबाहेरील विद्यार्थ्यांनी केंद्रीभूत प्रवेश प्रक्रीये मधून प्रवेश घेतला आहे अशा विद्यार्थ्यांनी अधिवास प्रमाणपत्र महाराष्ट्र राज्य यांचे सादर करावे.
- महाराष्ट्र कर्नाटक सिमा भागातील विद्यार्थ्यांसाठीही ही योजना लागू असून त्यांचा प्रवेश MKB मधुन झालेला असला पाहीजे.
- संस्थास्तरावर ( मॅनेजमेंट कोटा) आणि अगेन्स्ट व्हेकन्सी मधून प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांसाठी ही योजना लागू नाही.
- ज्यांचा प्रवेश TFWS मधून कॅटेगरी फॉर अॅडमिशन ओपन असा झालेला आहे ते या योजनेसाठी पात्र आहेत.
- मिळणारे लाभ – जे विद्यार्थी राज्यातील महानगरातील महाविद्यालयात (मुंबई व पुणे महानगर प्रादेशिक विकास प्राधिकरण क्षेत्रातील सर्व शहरे, औरंगाबाद, नागपूर) प्रवेशित आहेत, त्या विद्यार्थ्यांसाठी प्रति विद्यार्थी प्रतिमहा रु.३०००/- व राज्यातील अन्य ठिकाणी असलेल्या महाविद्यालयात प्रवेशित विद्यार्थ्यांसाठी प्रतिमहा रु.२०००/- इतका वसतिगृह निर्वाह भत्ता देण्यास मान्यता आहे. निर्वाह भत्ता १० महिन्याच्या कालावधीकरिता अनुज्ञेय आहे.
- ज्या विद्यार्थ्यांचे पालक सक्षम प्राधीकाऱ्यामार्फत प्रमाणित केल्याप्रमाणे अल्पभूधारक शेतकरी आहेत किंवा ज्यांचे पालक नोंदणीकृत मजूर आहेत अशा विद्यार्थ्यांसाठी ही योजना आहे.
- !!! तसेच जे विद्यार्थी त्यांच्या पालकांचे सक्षम प्राधीकाऱ्यामार्फत प्रमाणित केल्याप्रमाणे अल्पभूधारक शेतकरी किंवा नोंदणीकृत मजूर हे प्रमाणपत्र सादर करु शकत नाहीत व जे विद्यार्थी राज्यातील महानगरातील महाविद्यालयात (मुंबई व पुणे महानगर प्रादेशिक विकास प्राधिकरण क्षेत्रातील सर्व शहरे, औरंगाबाद, नागपूर) प्रवेशित आहेत, त्या विद्यार्थ्यांसाठी प्रति वार्षीक १००००/- व राज्यातील अन्य ठिकाणी असलेल्या महाविद्यालयात प्रवेशित विद्यार्थ्यांसाठी प्रतिवर्षी रु.८०००/- इतका वसतिगृह निर्वाह भत्ता देण्यास मान्यता आहे.

शैक्षणिक वर्ष 2022-23 मध्ये पदवी (यु.जी.) इंजिनिअरींग व पदव्युत्तर पदवी (पी.जी.) एमसीए कोर्सला (रेग्युलर व प्रोव्हीजनल) प्रवेशीत आहेत अशा सर्व नव्या आणि जुन्या विद्यार्थ्यांनी महाराष्ट्र शासनाच्या https://mahadbtmahait.gov.in या ऑनलाईन साईटवर शैक्षणिक वर्ष 2022-23 साठी ऑनलाईन अर्ज भरणे आवश्यक आहे. (स्कीम लागू होत असल्यास) अंतिम मुदत 31 डिसेंबर 2022 पर्यन्त ऑनलाईन भरून ऑनलाइन सबमीट करावयाचे आहेत. (form ची हार्ड कॉपी कॉलेज मध्ये सबमिट करायची तारीख नंतर सांगण्यात येईल.)

**वरील योजनांसाठी शैक्षणिक वर्ष 2022-23 मध्ये विद्यार्थ्यांची वर्गामधील उपस्थीती प्रत्येक महिन्याची 75% व प्रत्येक सेमीस्टरच्या सर्व परीक्षा देणे आवश्यक आहे.**

**राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना शैक्षणिक वर्ष 2022-23 FOR OPEN CATEGORY OR CATEGORY FOR ADMISSION-OPEN STUDENT (FOR FAMT NEWLY ADMITTED STUDENT IN ACADEMIC YEAR 2022-23, CLASS FE,FY,DSE)**

**आणि**

**राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना शैक्षणिक वर्ष 2022-23 FOR OPEN CATEGORY OR CATEGORY FOR ADMISSION-OPEN STUDENT (FOR FAMT OLD STUDENT CLASS SE,TE,BE,SY)**

**या वरील दोन नोटिस मध्ये (famt.ac.in site वर नोटिस उपलब्ध http://famt.ac.in/scholarship/ यानंतर scholarship schemes हा मेनू open करावा.) दिल्याप्रमाणे Table A व Table B प्रमाणे आवश्यक ती सर्व माहिती भरावी.**

ज्यांनी Finolex Academy मध्ये प्रवेश घेतल्यानंतर या scheme चा फॉर्म ऑनलाइन mahadbt वर भरलेला आहे ते सर्व विद्यार्थी त्यांचा फॉर्म RENEWAL या प्रकारात भरतील.

आणि

ज्यांनी Finolex Academy मध्ये प्रवेश घेतल्यानंतर या scheme चा फॉर्म ऑनलाइन mahadbt वर या पूर्वी कधीच भरलेला नाही ते सर्व विद्यार्थी त्यांचा फॉर्म FRESH या प्रकारात भरतील.

**मुख्य कागदपत्रे खालील प्रमाणे.**

०१) अल्पभूधारक शेतकरी किंवा नोंदणीकृत मजूर मुळ प्रमाणपत्र पालकांचे (वडीलांचे नावे. वडील ह्यात नसल्यास आईचे नावे) ही कागदपत्रे नसल्यास मिळणार लाभ हा वेगळा आहे. या बाबत वरील नोटिस मध्ये !!! अशी खूण देऊन माहिती दिलेली आहे ती वाचावी.

०२) पालकांचे आधार कार्ड – फोटोकॉपी.

०३) हॉस्टेल माहिती भरताना खालील माहितीची नोंद प्रतिज्ञापत्रात असणे आवश्यक (हे प्रतिज्ञा पत्र जागा मालकाने दिलेले असले पाहिजे व त्यामध्ये शेवटी तुमचे सहमतीचा उल्लेख त्यामध्ये असणे आवश्यक. Stamp paper लिहून देणाऱ्यांना तुमचे सहमतीचा paragraph त्या मध्ये add करण्यास सांगणे.)

1) यामध्ये विद्यार्थ्याचा कायमचा पत्ता व वसतिगृहाचा पत्ता पूर्ण लिहिलेला असलाच पाहिजे.

2) विद्यार्थी केव्हापासून व किती तारखेपर्यंत वसतिगृहात राहणार आहे व का राहणार आहे याची नोंद असली पाहिजे.

3) शैक्षणिक वर्ष 2022-23 मध्ये कॉलेज जेव्हा प्रत्यक्ष चालू झाले त्या तारखेचा उल्लेख वसतिगृहात केव्हापासून राहत आहात ती तारीख त्या मध्ये नमूद असली पाहिजे.

4) जास्तीत जास्त 10 महीने किंवा त्या पेक्षा कमी कालावधी हॉस्टेल मध्ये राहिले आहात त्या कालावधीसाठी या योजनेचा लाभ लागू राहील.

5) नोंदणीकृत / खासगी / कॉलेजच्या वसतीगृहाची फी भरल्याची मूळ पावती (ज्यामध्ये वार्षिक खर्चाचा तपशील व राहण्याची व जेवणाची सोय एकाच ठिकाणी असल्याचे उल्लेख असला पाहीजे.)

6) तसेच राहण्याच्या व मेसच्या खर्चाची एकत्रीत पावती रेव्हीन्यु स्टॅप लाऊन जागा मालाकाकडून घेणे व त्यावर त्यांची सही व शिक्का असणे आवश्यक व प्रतिज्ञापत्राबरोबर अपलोड करणे आवश्यक.

7) वसतीगृहाचे नोंदणीचे प्रमाणपत्राची फोटोकॉपी. रुम घेऊन किंवा भाडेतत्वावर रहात असल्यास जागा

मालकाबरोबरचे करारपत्र.

8) प्रतिज्ञापत्र रजिस्टर (सेतु कार्यालय) किंवा नोटराईज केलेले आवश्यक.

०४) उत्पन्नाचा दाखला आर्थिक वर्ष 2021-22 चा-फोटोकॉपी आवश्यक. (उत्पन्न मर्यादा आठ लाखा पर्यन्त).

०५) Domicile Certificate (महाराष्ट्र राज्याचे अधिवास प्रमाणपत्र)

वरील सुचने बाबत जे वेळोवेळी बदल होतील ते ज्या त्या स्कॉलरशिप स्कीम प्रमाणे वेबसाइट वर जाऊन प्रत्येकाने वेळोवेळी पहावेत. अधिक माहीतीसाठी विद्यार्थ्यांनी **https://mahadbtmahait.gov.in** या संकेतस्थळावरील व्हीडीओ व महाराष्ट्र शासनाचे शासन निर्णय व इतर माहीती यांचे अवलोकन करावे. वरील बाबत काही शंका असल्यास विद्यार्थ्यांनी काऊंटर नंबर 07 (SFC-2 मध्ये) ला श्री. मिलिंद कोल्हटकर यांना प्रत्यक्ष येऊन ऑफिस वेळेत संपर्क करावा.

विशेष सूचना - स्कॉलरशिप बाबत लवकरात लवकर माहिती विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचावी यासाठी श्री. मिलिंद कोल्हटकर, स्कॉलरशिप विभाग, **Finolex Academy, Telegram App** च्या ग्रुप मधून मेसेज पाठवत असतात. ज्या कोणाला अशी माहिती मिळणे आवश्यक वाटत असेल त्यांनी 9423875371 हा मोबाइल नंबर आपल्या मोबाइल कॉनटॅक्ट लिस्ट मध्ये **save** करावा व आपले पूर्ण नाव, कॉलेज रजिस्ट्रेशन नंबर, स्कॉलरशिप स्कीम नाव मला **Telegram** वर कळवावे. या बाबत कोणतीही सक्ती नसली तरी माहिती लवकरात लवकर प्राप्त व्हावी यासाठी सर्वांनी ग्रुप वर जॉइन व्हावे.)

FINOLEX ACADEMY OF MANAGEMENT AND TECHNOLOGY ★ RATNAGIRI ★ FAMT

प्राचार्य